महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

क्र दंडप्र-01/कावि/2020/326 दिनांक 26 जून, 2020

**विषय :- मंगल कार्यालयात लग्न समारंभ साजरा करण्यास परवानगी बाबत..**

## सुधारीत परिपत्रक :-

जळगांव जिल्हयात करोना विषाणूचा (कोव्हिड-19) वाढता प्रादुर्भाव व कोव्हिड-19 पॉझिटीव्ह रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, जिल्हा प्रशासनामार्फत अनेक प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जात आहेत. सदर प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून वेळोवेळी शासनामार्फत तसेच जिल्हा प्रशासनामार्फत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 31 मे, 2020 व या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/265, दिनांक 31 मे, 2020 अन्वये लॉकडाऊन कालावधीत केवळ 50 लोकांच्या मर्यादेत Social Distancing चे पालन करुन लग्न समारंभ साजरा करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि लग्न समारंभ कोणकोणत्या ठिकाणी पार पाडता येतील याबाबतचा उल्लेख सदर आदेशामध्ये नसल्याने महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक डीएमयु-2020/प्रक्र 92/ आव्यप्र-1 दिनांक 22 जून, 2020 अन्वये पावसाळा सुरु झालेला असल्याने खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह तसेच घर व घराच्या परिसरात केवळ 50 लोकांच्या मर्यादेत लग्न समारंभ पार पाडण्यास नागरीकांकडून मागणी प्राप्त झाल्यास परवानगी देण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

सदरची बाब लक्षात घेता, लॉकडाऊन कालावधीत खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह तसेच घर व घराच्या परिसरात लग्न समारंभ पार पाडण्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

1) खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह तसेच घर व घराच्या परिसरात केवळ 50 लोकांच्या मर्यादेत लग्न समारंभ आयोजित करण्यासाठी नागरीकांकडून परवानगी अर्ज प्राप्त झाल्यास सदर अर्जाबाबत **आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव** यांनी **महानगरपालिका क्षेत्रात** व **महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर क्षेत्रात कार्यकारी दंडाधिकारी तथा Incident Commander** यांनी परवानगी द्यावी.
2) अशा प्रकारे परवानगी निर्गमित करतांना त्याबाबतच्या आवश्यक त्या सर्व नोंदी स्वतंत्रपणे नोंदवही मध्ये ठेवण्यात याव्यात.
3) कोव्हिड-19 विषाणू चे प्रादुर्भाव / संसर्ग बाबत शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करणार असल्याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे.
4) खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह तसेच घर व घराच्या परिसरात लग्न समारंभ आयोजित करण्यासाठी आयोजकांनी सदर समारंभास उपस्थित राहणा-या सर्व व्यक्तींचे अनुषंगिक कागदपत्रांसह वर नमूद कार्यालयाकडेस यासोबतच्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी

Scanned with CamScanner

5) जळगांव जिल्हयात घोषित करण्यात आलेल्या व वेळोवेळी घोषित होणा-या Containment Zone मध्ये खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह तसेच घर व घराच्या परिसरात लग्न समारंभ आयोजित करण्याची परवानगी अनुज्ञेय असणार नाही.

6) अशा प्रकारे लग्न समारंभाची परवानगी देतांना लग्न समारंभास उपस्थित राहणा-या व्यक्तींचे आवश्यक ते कागदपत्रे तपासून सदर व्यक्ती ही Containment Zone मध्ये वास्तव्यास आहे किंवा नाही याची खात्री करण्यात यावी व अशा व्यक्तींना प्रवेश नाकारण्यात यावा.

7) खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह तसेच घर व घराच्या परिसरात लग्न समारंभ आयोजित करतांना उपस्थित नागरीकांनी चेह-यावर मास्क लावणे, सॅनिटाईजर्सचा वापर करणे बंधनकारक राहील.

8) खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह तसेच घर व घराच्या परिसरात हात धुण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी आयोजक यांची राहील.

9) लग्न समारंभ आयोजित करतांना आयोजकांनी कोव्हिड-19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे पालन करणे आवश्यक राहील.

वरील सुचनांचे पालन न केल्यास सर्व संबंधितांवर आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 व भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 नुसार कारवाई करण्यात येईल, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
5. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद सर्व

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदर परिपत्रकास स्थानिक वर्तमानपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी द्यावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील परिपत्रकाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner

प्रति,

मा आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका / मा कार्यकारी दंडाधिकारी

मा पोलीस निरीक्षक ---------------- पोलीस स्टेशन

**विषय :-** लग्न समारंभ बाबत..

**महोदय,**

मी ------------------------------------------------------------------------------, रा ------------- ------------------------------------------------------------, मोबाईल क्रमांक--------------------------------------- विनंती अर्ज सादर करतो / करते की, ------------------------------------------------ हा / ही माझा / माझी मुलगा / मुलगी / नातेवाईक यांचा लग्न सोहळा दिनांक --------------------- रोजी ------------------------------------------- या ठिकाणी केवळ 50 व्यक्तींच्या उपस्थितीत आयोजित करणार आहे. सदर ठिकाणी कोव्हिड-19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करणार असून सोहळयास उपस्थित सर्व व्यक्ती Social Distancing चे पालन करतील तसेच चेह-यावर मास्क लावणे, सॅनिटाईजर्सचा वापर करणे आम्हांस बंधनकारक राहील.

अर्जदार

-----------------------------------------

Scanned with CamScanner